# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १५८ वा ❑ भारतीय सौर दिनांक १४ श्रावण शके १९४८, बुधवार दि.०५ ऑगस्ट २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### 'हातात पुस्तके आणि डोक्यात विचार'

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

झारखंडमधील आणि परीक्षांमधील कथित पेपरफुटी, भ्रष्टाचार आणि संपूर्ण परीक्षा प्रणालीतील गैरव्यवहाराविरोधात राज्यातील लाखो विद्यार्थ्यांनी पुकारलेले आंदोलन हे लोकशाही, संयम आणि शांततापूर्ण मार्गाचे एक ऐतिहासिक व आदर्श उदाहरण ठरत आहे. भूतकाळात दिल्ली किंवा देशाच्या इतर भागांत झालेल्या काही विद्यार्थी आंदोलनांमध्ये ज्या प्रकारे हिंसक गोंधळ, कायदा-सुव्यवस्थेची कोंडी किंवा सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान पाहायला मिळाले होते, तसा कोणताही गालबोट लावणारा प्रकार रांचीमधील या आंदोलनात कुठेही दिसून आलेला नाही. उलट, येथील सुशिक्षित, सुसंस्कृत आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या सुजाण तरुणांनी आपल्या या संघर्षाला एका अत्यंत प्रभावी 'आधुनिक सत्याग्रहाचे' रूप दिले आहे. रांचीच्या ऐतिहासिक जयपाल सिंग मुंडा स्टेडियमवर सध्या पावसाचे दिवस असूनही विद्यार्थ्यांनी तेथेच तंबू ठोकून ठाण मांडले आहे. ते तिथेच आपले जेवण स्वतः बनवत आहेत आणि सर्वात कौतुकास्पद बाब म्हणजे, आंदोलनाच्या घोषणाबाजी आणि उपोषणाच्या वातावरणातही विद्यार्थ्यांनी आपला संयम ढळू दिलेला नाही. या कठीण परिस्थितीतही तंबूंमध्ये पुस्तके उघडून आगामी परीक्षांचा अभ्यास सुरू ठेवण्याची त्यांची ही अनोखी पद्धत संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेत आहे.

कोणतेही राजकीय नेते, सेलिब्रिटी किंवा व्यावसायिक आंदोलक नाहीत; केवळ हक्काच्या भविष्यासाठी लढणारे सामान्य तरुण आहेत. महागडे तंबू किंवा व्हीआयपी सोयींऐवजी पावसापासून वाचण्यासाठी ताकारीचे कागद (तिरपाल) आणि मंदिरातून किंवा स्थानिकांकडून मिळणाऱ्या साध्या अन्नावर विद्यार्थी तग धरून आहेत. दिवसा आंदोलन, रात्री अभ्यास हे या आंदोलनाचे वैशिष्ट्ये म्हणून सांगता येईल. दिवसा निदर्शने व सत्याग्रह आणि रात्री अभ्यासाची सांगड घालून विद्यार्थ्यांनी संघर्षाचा एक वेगळाच आदर्श समोर ठेवला आहे. शिस्तप्रिय निषेध हे देखील या आंदोलनाचे वैशिष्ट्ये आहे. घोषणाबाजीमध्ये कोणतीही असंसदीय भाषा किंवा हिंसेला स्थान नसून लोकशाही मार्गाने न्याय मागणे हे याचे मुख्य सूत्र आहे.

हातात लाठ्या-काठ्या किंवा दगड घेण्याऐवजी 'हातात पुस्तके आणि डोक्यात विचार' घेऊन लढणाऱ्या या तरुणांमुळे आंदोलनाला एक अभूतपूर्व नैतिक बळ मिळाले आहे. यामुळे प्रशासनाला किंवा सरकारला कोणत्याही प्रकारे बळाचा वापर करून किंवा पोलिसांचा धाक दाखवून हे आंदोलन दडपून टाकणे नैतिक आणि कायदेशीरदृष्ट्या पूर्णपणे अशक्य झाले आहे. हिंसक आंदोलनांमुळे मूळ मुद्द्यावरून लक्ष विचलित होते आणि जनमानसात नकारात्मक संदेश जातो, परंतु झारखंडमधील विद्यार्थ्यांनी निवडलेल्या या शांततापूर्ण आणि शिस्तबद्ध मार्गामुळे संपूर्ण देशातून त्यांना प्रचंड सहानुभूती आणि पाठिंबा मिळत आहे. देशातील विविध शहरांमधून नागरिक आणि सामाजिक संस्था या आंदोलक विद्यार्थ्यांसाठी अन्नधान्य, औषधे व इतर आवश्यक रसद स्वतःहून पाठवत आहेत. ५ जुलैपासून सुरू झालेल्या या संपूर्ण लढ्यात विद्यार्थ्यांनी पहिल्या दिवसापासून केवळ कायदेशीर आणि सनदशीर मार्गांचाच अवलंब केला आहे; मग ते राज्यपालांना भेटून निवेदन देणे असो, वा मुख्यमंत्र्यांकडे थेट पुराव्यांची फाईल सुपूर्द करणे असो.

जंतर मंतर वर ज्या प्रमाणे सोनम वांगचूक यांचे नेतृत्व मिळाले तसेच नेतृत्व झारखंड आंदोलनाला देखील

नेतृत्व देवेंद्र नाथ महातो हे करत आहेत.प्रमुख चेहरा: विद्यार्थी नेते देवेंद्र नाथ महातो हे या संपूर्ण आंदोलनाचा मुख्य चेहरा म्हणून पुढे आले असून, त्यांनी मागण्यांच्या पूर्ततेसाठी आमरण उपोषणही सुरू केले आहे.हे आंदोलन जॉइंट स्टुडंट्स फ्रंट अंतर्गत हजारो विद्यार्थ्यांच्या सहभागाने सुरू आहे.

झारखंडमधील विद्यार्थी आंदोलन हे प्रामुख्याने गैर-राजकीय आणि विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या नेतृत्वाखालील चळवळ म्हणून ओळखले जात आहे. जरी काही राजकीय गट किंवा व्यक्तींनी वरवर पाठिंबा दर्शवला असला, तरी हे आंदोलन कोणत्याही मोठ्या राजकीय पक्षाच्या अजेंडावर किंवा नेतृत्वाखाली सुरू झालेले नाही, तर विद्यार्थी स्वतः आपल्या हक्कासाठी रस्त्यावर उतरले आहेत. याच अत्यंत पद्धतशीर आणि शांततापूर्ण दबावाचा परिणाम म्हणून अखेर च्या अध्यक्षांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला असून, राज्य सरकारच्या निर्देशानंतर यूसीआयडीने वेगाने कारवाई करत माजी उप-परीक्षा नियंत्रक आणि परीक्षा घेणाऱ्या एजन्सीच्या संचालकांसह आतापर्यंत १२ मुख्य सूत्रधारांना बेड्या ठोकल्या आहेत. जरी सीआयडीचे हे अटकसत्र सुरू असले, तरी जोपर्यंत १४ वी पूर्व परीक्षा पूर्णपणे रद्द होत नाही आणि या महाघोटाळ्याची चौकशी केंद्रीय अन्वेषण विभागाकडे सोपवली जात नाही, तोपर्यंत मैदानातून न हटण्याचा ठाम निर्धार विद्यार्थ्यांनी केला आहे. हिंसेपेक्षा शांततेच्या आणि सत्याग्रहाच्या मार्गात संपूर्ण व्यवस्थेला झुकवण्याची किती मोठी ताकद असते, हेच झारखंडमधील या तरुण उमेदवारांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे. येत्या ६ ऑगस्ट रोजी होणाऱ्या विधानसभा घेरावच्या इशाऱ्यापूर्वी, हा शांततापूर्ण आणि पवित्र लढा या विद्यार्थ्यांना त्यांचा हक्काचा न्याय निश्चितपणे मिळवून देईल, असा विश्वास आता अधिक दृढ होत आहे.

## 'जंक फूड'पासून विद्यार्थ्यांना दूर ठेवण्यासाठी शाळा-महाविद्यालयांनी पुढाकार घ्यावा

### तुकाराम मुंढे यांच्या पुढाकाराने जनजागृतीला चालना

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करता शाळा-महाविद्यालयांनी जंक फूड आणि व्यसनाधीन पदार्थांपासून विद्यार्थ्यांना दूर ठेवण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने २०२० मध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित अन्न व संतुलित आहारासंदर्भात नियम अधिसूचित केले आहेत. त्यानुसार शाळेच्या कॅन्टीन, मेस, हॉस्टेल तसेच शाळेच्या प्रवेशद्वारापासून ५० मीटर परिसरात



अधिक चरबी, साखर आणि मीठ असलेल्या खाद्यपदार्थांच्या विक्रीवर निर्बंध घालण्यात आले आहेत.

याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांमध्ये जंक फूड आणि चुकीच्या आहाराच्या सवयींबाबत जनजागृती करण्यास तसेच नियमांच्या अंमलबजावणीला चालना देण्यात येत आहे.

राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांनी आपल्या परिसराची पाहणी करून जंक फूड, फास्ट फूड, शीतपेय, अधिक साखर-मीठ-चरबी असलेले पदार्थ तसेच गुटखा, तंबाखू व इतर व्यसनाधीन पदार्थांपासून विद्यार्थ्यांना दूर ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार, नियमित व्यायाम आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी जनजागृती उपक्रम राबवावेत.

आजच्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे म्हणजेच उद्याच्या पिढीचे आरोग्य आणि दीर्घायुष्य सुरक्षित करणे होय. त्यामुळे प्रत्येक शाळा-महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी 'निरोगी विद्यार्थी, निरोगी पिढी' या उद्देशाने या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

## पिं. चिं. मराठी पत्रकार संघातर्फे शालेय विद्यार्थ्यांना बिस्किटांचे वाटप



**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – अ. भा. मराठी पत्रकार परिषद अंतर्गत पिंपरी चिंचवड मराठी पत्रकार संघ आणि पिंपरी चिंचवड डिजिटल मिडिया परिषदेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त महानगरपालिकेच्या थेरगाव येथील पीएम श्री माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना बिस्किटांचे वाटप करण्यात आले. मंगळवार दि. ४ रोजी सकाळी शाळेच्या परिसरात झालेल्या या कार्यक्रमात अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष गणेश मोकाशे, पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे अध्यक्ष सागर सुर्यवंशी, डिजिटल मिडिया परिषदेचे अध्यक्ष विनय सोनवणे , तसेच पत्रकार सिध्दांत चौधरी, महावीर जाधव, नरेश जीनवाल, विजय न्यायाधीश, प्रशालेचे मुख्याध्यापक बी. ए. राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी गणेश मोकाशी आणि विनय सोनवणे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यकर्तुत्वाचा आढावा घेणारे मार्गदर्शनपर विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशालेचे शिक्षकवृंद नामदेव कोकणे, हर्षदा राऊत, इस्माईल मुल्ला, अकिब जावेद, मंगला आव्हाड, प्रतिभा शिंदे, सारिका कोळी, नेहा जाधव आदिंनी परिश्रम घेतले.

## आधार मूकबधिर विद्यालयातील १०३ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – ''ज्ञानाचा प्रकाश प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत''या उद्देशाने भारतीय संस्कृती संवर्धक संस्था,सेवा सहयोग आणि सणस वाडा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आज आधार मूकबधिर विद्यालय,बिबवेवाडी पोलीस चौकीच्या मागे,नवग्रह मंदिराजवळ,पुणे येथे शालेय साहित्य वितरण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.




या उपक्रमांतर्गत विद्यालयातील १०३ मूकबधिर विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या,कंपास पेटी तसेच गोष्टींची पुस्तके यांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या शिक्षणाला आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमास भारतीय संस्कृती संवर्धक संस्थेचे विश्वस्त बाजीराव मणेरे,रक्ताचे नाते चॅरिटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष राम बांगड,सणस वाडा प्रतिष्ठान चे अध्यक्ष तन्मय पारेकर ह्यांची मुख्य उपस्थिती होती.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.शिक्षण हा सामाजिक परिवर्तनाचा प्रभावी मार्ग असून,समाजातील प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आधार मूकबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक जयंत वानखेडे,शिक्षिका पूर्वा महाले, विश्वस्त विद्या गोखले व संस्थेचे कर्मचारी,तसेच भारतीय संस्कृती संवर्धक संस्था,सेवा सहयोग आणि सणस वाडा प्रतिष्ठानचे पदाधिकारी,स्वयंसेवक,कार्यकर्ते यांनी विशेष परिश्रम घेतले.उपस्थितांनी या समाजोपयोगी उपक्रमाचे मनापासून कौतुक करत भविष्यातही अशा शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली

## परीक्षा : गुणपत्रिकेपलीकडील जीवनाची कसोटी (भाग १)

**ज्योतिर्मय साहित्य**

''परीक्षा!'' हा शब्द उच्चारला की आजही अनेकांच्या मनात धडकी भरते. माझेही तसेच होते. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होऊन अनेक दशके उलटली, नोकरी झाली, विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या, निवृत्तीही आली; तरी कधीकधी स्वप्नात मी पुन्हा परीक्षेच्या सभागृहात बसलेलो असतो. प्रश्नपत्रिका हातात आलेली असते; पण पेन घरीच राहिल्याचे आठवते, कधी पेन्सिल नसते, कधी कंपासपेटी हरवलेली असते, तर कधी पेनमधील शाई संपलेली असते किंवा निब तुटलेली असते. स्वप्नातही धडधड वाढते. जाग आल्यावरच कळते की, ती परीक्षा नव्हती, तर आठवणींचा एक खेळ होता.

हे अनुभव केवळ माझेच नाहीत. अनेकांना अशी स्वप्ने पडतात. त्यावरून एक प्रश्न मनात येतो, शालेय परीक्षा संपून इतकी वर्षे झाली, तरीही ''परीक्षा'' हा शब्द मनात भीती का निर्माण करतो? कदाचित याचे कारण असे असेल की, परीक्षा ही केवळ प्रश्नपत्रिका, गुण आणि निकाल यापुरतीच मर्यादित नसते. ती आपल्या संपूर्ण आयुष्याशी जोडलेली असते.

आजच्या डिजिटल युगातील तरुणांना ''शाईची दौत'', ''निब'', ''टीपकागद'' (ब्लॉटिंग पेपर) हे शब्दही अनोळखी वाटू शकतात. आमच्या काळात शाईचे पेन वापरताना शाई संपणे, हातावर डाग पडणे, वही खराब होणे किंवा निब तुटणे या छोट्या अडचणीही विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा भाग होत्या. त्या वेळी त्या अडचणी मोठ्या वाटत होत्या; पण आज मागे वळून पाहिले की, त्या देखील आयुष्याने घेतलेल्या छोट्याशा परीक्षाच होत्या. साधने बदलली, तंत्रज्ञान बदलले; पण परीक्षा बदलली नाही. तिचे स्वरूप बदलले, एवढेच.

खरे तर परीक्षा म्हणजे केवळ शाळा किंवा विद्यापीठातील लेखी परीक्षा नव्हे. माणसाचे संपूर्ण आयुष्यच परीक्षांनी व्यापलेले आहे. बालपणी अभ्यासाची परीक्षा असते; तारुण्यात करिअरची; पुढे नोकरी, व्यवसाय, संसार, नातेसंबंध, आरोग्य, आर्थिक जबाबदाऱ्या आणि सामाजिक कर्तव्ये, प्रत्येक टप्प्यावर आपली कसोटी लागत असते. काही परीक्षा प्रश्नपत्रिकेवर लिहिल्या जातात; काही काळ आपल्या आयुष्यावर लिहितो.




इंग्रजीतील एक्झामिनेशन या शब्दाचा अर्थ केवळ उत्तरपत्रिका लिहिणे असा नाही. एखाद्या गोष्टीचे काळजीपूर्वक परीक्षण करणे, तिचे स्वरूप समजून घेणे, सत्यता पडताळणे आणि योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचणे असा त्याचा व्यापक अर्थ आहे. या अर्थाशी जवळीक साधणारे दोन सुंदर संस्कृतोद्भव शब्द म्हणजे निरीक्षण आणि चिकित्सा.

निरीक्षण म्हणजे फक्त डोळ्यांनी पाहणे नव्हे. एखाद्या गोष्टीकडे एकाग्रतेने पाहणे, तिचे सूक्ष्म बारकावे टिपणे, पूर्वानुभवाशी तुलना करणे आणि त्यामागील कारणांचा शोध घेणे म्हणजे निरीक्षण. प्रयोगशाळेतील वैज्ञानिक प्रयोग असो, दुर्बिणीतून ग्रह-ताऱ्यांचे निरीक्षण असो, पक्षीनिरीक्षण असो किंवा चित्रकाराच्या कलाकृतीचा अभ्यास असो, प्रत्येक ठिकाणी डोळ्यांबरोबर मन आणि बुद्धीही जागृत असावी लागते.

''चिकित्सा'' या शब्दाचाही अर्थ केवळ वैद्यकीय उपचार असा नाही. आपण ''चिकित्सक वृत्ती'' हा शब्दप्रयोग नेहमी वापरतो. त्याचा अर्थ दोष शोधणे नसून, उपलब्ध माहितीचे विवेकपूर्वक विश्लेषण करणे, सत्य-असत्याचा विचार करणे आणि योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचणे असा आहे. ज्ञानाचा पाया चिकित्सक वृत्तीतच असतो.

यामुळेच परीक्षा, निरीक्षण आणि चिकित्सा हे शब्द एकमेकांच्या अत्यंत जवळचे असले, तरी ते पूर्णपणे समानार्थी नाहीत, उलट ते एकमेकांशी जोडलेल्या क्रमिक-प्रक्रिया आहेत. प्रथम निरीक्षण, त्यानंतर परीक्षण, मग मापन, त्यानंतर विश्लेषण किंवा चिकित्सा, त्यावर आधारित नियंत्रण आणि शेवटी सुधारणा. या सर्व टप्प्यांतूनच उत्कृष्टतेचा जन्म होतो.

ही प्रक्रिया पुढीलप्रमाणे समजता येईल

निरीक्षण परीक्षण मापन विश्लेषण (चिकित्सा) नियंत्रण सुधारणा उत्कृष्टता


ही साखळी समजून घेतली की परीक्षा हा शब्द भीतीदायक वाटत नाही; उलट तो प्रगतीचा पहिला टप्पा वाटू लागतो. हे अधिक स्पष्ट करण्यासाठी एक साधे उदाहरण घेऊ या. समृद्धी महामार्गावरून मुंबईहून नागपूरला अखंड प्रवास करणे ही एक रेषीय प्रक्रिया आहे; परंतु प्रत्येक टोल नाका पार करीत, प्रत्येक टप्पा पूर्ण करीत पुढे जाणे ही क्रमिक प्रक्रिया आहे. कोणताही टप्पा वगळून पुढे जाता येत नाही. तसेच सिडनीहून लंडनला थेट विमानप्रवास हा सरळ प्रवास; पण सिडनीसिंगापूरमुंबईदुबईफ्रँकफुर्टलंडन असा प्रवास हा क्रमशः पुढे सरकणारा प्रवास आहे.

ज्ञानप्राप्तीचेही तसेच आहे. योग्य निरीक्षणाशिवाय परीक्षण होत नाही; परीक्षणाशिवाय मापन होत नाही; मापनाशिवाय चिकित्सा होत नाही; आणि चिकित्सेशिवाय सुधारणा अशक्य असते.

संस्कृतमध्ये एक सुंदर वचन आहे.

''परीक्ष्य कार्यमाचरेत।''

म्हणजेच, कोणतेही कार्य करण्यापूर्वी त्याची योग्य परीक्षा करूनच कृती करावी. जीवनातील अनेक चुका टाळण्याचा हा एक साधा पण अत्यंत प्रभावी मंत्र आहे. (क्रमशः)




## जात्यावरच्या ओव्या......

चल चल मह्या जीवा
नको इचार वाईट
देव देणारा बसला
तोच सांभाळतो निट ||७७८||

चल चल मह्या जीवा
अरे, कर्मात धर्म
दोन अक्षरामधी
साऱ्या जीवनाच मर्म ||७८९||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ५९




**ज्योतिर्मय साहित्य**

समर्थांनी दासबोधात सांगितले आहे की आधी प्रपंच करावा नेटका, मग घ्यावे परमार्थ विवेका. ज्याला प्रपंच नीट करता आला नाही त्याला परमार्थ कसा जमणार ? म्हणून आपल्याला यशस्वी प्रपंच करून परमार्थाकडे वाटचाल करायची आहे. अस्थिर मनाने प्रपंच आणि परमार्थ ही साधणार नाही.

कल्पना करीत राहणे हा मानवी स्वभाव आहे. या कल्पनाच आपल्याला विषयांच्या राज्यात घेऊन जातात आणि त्यांच्या तीव्र ओढीने विषयांचे सेवन आपल्याकडून घडते. साहजिकच भगवंतापासून आपण दूर जात असतो. ज्याप्रमाणे एका म्यानात दोन तलवारी राहू शकत नाहीत, त्याप्रमाणे मनामध्ये विषय चिंतन आणि भगवंत या दोन्ही गोष्टी एकाच वेळी राहू शकत नाहीत. मन एकाच गोष्टीला पूर्णपणे वाहिले पाहिजे.



परमार्थाकडे वाटचाल करताना मनामध्ये वासना असता कामा नये. वासना असतील तर आपल्याला भगवंत हवा, अगदी मनापासून हवा असे वाटणारच नाही. जोपर्यंत आपल्याला भगवंतच हवा आहे असे मनापासून वाटत नाही तोपर्यंत त्याच्याबद्दल प्रेम निर्माण होणार नाही. भगवंत हवा आहे असे मनापासून वाटत असेल तर विषयाकडे धावणारी वृत्ती सवयीने हळूहळू कमी करायला हवी. त्यासाठीच नामस्मरण, पूजा, सत्संग, साधना इ. गोष्टी सांगितल्या आहेत.


पण विषयाकडे धावणारे मन नाना प्रकारच्या कल्पना करीत राहते. मनाची शक्ती अपार आहे. परंतु आपण या शक्तीचा योग्य वापर करण्यापेक्षा गैरवापरच जास्त करीत असतो. दिशाहीन आणि निरुपयोगी कल्पना मनाला थकवा आणतात. म्हणूनच मनाला प्रयत्नपूर्वक योग्य मार्गावर आणायला हवे आणि त्याला योग्य दिशा द्यायला हवी. मला भगवंत हवा आहे अशी निव्वळ इच्छा करून तो प्राप्त होणार नाही. तर त्यासाठी प्रयत्न करावे लागतील. विवेक आणि वैराग्य धारण करावे लागेल. भगवंत हवा असेल तर अन्य सर्व इच्छांचा त्याग करून त्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. एखाद्या गोष्टीचा नित्य सहवास लाभला की त्याबद्दल आपल्याला प्रेम निर्माण होते. त्याप्रमाणेच सतत भगवंताचे नाम घेत गेल्याने त्याच्याबद्दल आदरयुक्त प्रेम निर्माण होईल.

स्वसंवाद : १) माझ्या मनात दिवसभर कोणत्या प्रकारच्या कल्पना सर्वाधिक येतात ? विधायक की विषयप्रधान?

२) मी वास्तवात जगतो का, की कल्पनांच्या जगात जास्त वेळ घालवतो?

३) मला खरोखर भगवंताची ओढ आहे का, की ती केवळ एक वरवरची इच्छा आहे?

४) मी माझ्या मनाला जाणीवपूर्वक योग्य दिशेला वळवण्यासाठी काही प्रयत्न करतो का (नामस्मरण, वाचन, सत्संग) ? **(क्रमशः)**




## || संजय उवाच... ||




@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ कलंक

कलंक हा अतिशय वाईट डाग असतो, तो एकदा आपल्यावर लागला की आयुष्य निरस होते, म्हणून कोणतेही कार्य कुठल्याही मोहापायी करू नये, कुठललेही अनैतिक कामं करून कलंक लावून घेऊ नये. कलंक कधीचं पुसल्या जात नसतो.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

## सगुणभक्ति



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

**ज्योतिर्मय साहित्य**

सर्वांभूती भगवंत आहे याची खात्री पटायच्या आधी, तो माझ्यात आहे हे पटले पाहिजे. सोन्याचा दागिना 'मला सोने भेटवा' असे म्हणत नाही; त्याचप्रमाणे, मला भगवंत बाहेरून कुठून भेटायचा आहे असे नाही समजू. तो आपल्याजवळच आहे. मनुष्य बोलतो तसा जर वागला तर त्याला त्याची प्रचीती आल्याशिवाय राहणार नाही. मी 'कुणाचा' आहे हे जर जाणले तर मी 'कोण' हे कळायला वेळ लागायला नको. सत्समागम केला म्हणजे मी कोण आहे हे कळते. साक्षीरूपाने नटलेला जो 'मी', त्याला पाहायला जंगलात जायला नको. 'माझेपण' सोडावे म्हणजे 'मी' चा बोध होतो. भगवंत चोहोकडे भरलेला आहे असे आपण नुसते तोंडाने म्हणतो, पण त्याप्रमाणे वागत नाही हे आपले मूळ चुकते. भगवंत माझ्यात आहे तसाच तो दुसऱ्यातही आहे, हे आपण सोयिस्करपणे विसरून जातो. जसा खोलीतला दिवा प्रकाशाने सर्व खोली व्यापून टाकतो, तसे हे सर्व जग भगवंताने व्यापून टाकले आहे. मी कर्ता नसून राम कर्ता आहे हे म्हटले म्हणजे त्यात सर्व आले. पोशाख निरनिराळे केले तरी मनुष्य हा एकच असतो. संन्यास हा मनाचा असतो, पोशाखाचा नसतो. मनावर कशाचाच परिणाम होऊ न देणे हाच संन्यास.

सगुणभक्ती करावी, भक्तीने नाम घ्यावे, नामात भगवंत आहे असे जाणावे, आणि भगवंताचे होऊन राहावे, हाच परमार्थाचा सुलभ मार्ग आहे. साधुसंतांनी अतिशय परिश्रम घेऊन आणि स्वत: अनुभव घेऊन हा मार्ग आपल्याला दाखवून दिला आहे. आपले ज्याच्याशी साम्य आहे त्याच्याशी आपली मैत्री जमते. आपण देही असल्यामुळे आज आपला देवही आपल्यासारखाच, पण त्याच्याही पलीकडे असणारा असा पाहिजे. अशा प्रकारचा देव म्हणजे सगुण मूर्ती होय. लहान मुलगा एखाद्या वस्तूसाठी हट्ट करू लागला की, आपण त्याच्यापुढे त्या वस्तूसारख्या इतर, पण बाधक नसणाऱ्या वस्तू टाकतो. त्याचप्रमाणे, सगुणोपासनेचा परिणाम होतो. दृश्य वस्तूंवर आपले प्रेम आहे; जे दिसते तेच सुखाचे आहे असे आपल्याला आज वाटते; म्हणून आपणच आपल्या कल्पनेने भगवंताला सगुण बनविला आणि त्याची उपासना केली. आपली बुद्धी निश्चयात्मक होण्यात या उपासनेचा शेवट होईल. आग्रह आणि प्रेम फक्त एका भगवंताच्या ध्येयाबद्दल असावे. इतर ध्येये असावीत, पण त्यांचा आग्रह नसावा. प्रपंचामध्ये व्यवहार होत असताना भगवंतापासून जेव्हा वृत्ती हलत नाही, तेव्हा तिला 'सहजसमाधी' असे म्हणतात. सहजपणाने जगणे, म्हणजे सहजपणातून वेगळे न राहणे, हीच सहजसमाधी होय. 'राम सर्व करतो' आणि 'राम माझा दाता आहे' ही भावना ज्याची स्थिर झाली, त्याच्यावर भगवंताची कृपा झाली असे समजावे. त्याच्या जन्माचे सार्थक झाले हे सांगणे नकोच.

नाम घेताना स्वतःचा विसर पडणे ही सर्वोत्कृष्ट समाधी होय. नामात स्वतःला विसरण्यास शिकावे.

**

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

### संत श्रेष्ठ जनाबाई यांचा अभंग

धरिला पंढरीचा चोर
धरिला पंढरीचा चोर ।
गळां बांधोनिया दोर ॥१॥
हुदय बंदिखाना केला ।
आंत विठ्ठल कोंडिला ॥२॥
शब्दें केली जडाजुडी ।
विठ्ठल पायीं घातली बेडी ॥३॥
सोहं शब्दाचा मारा केला ।
विठ्ठल काकुलती आला ॥४॥
जनी म्हणे बा विठ्ठला ।
जीवें न सोडीं मी तुला ॥५॥

संतश्रेष्ठ जनाबाई यांचा धरिला पंढरीचा चोर हा एक अत्यंत गोड असा अभंग आहे. या अभंगाचे रसग्रहण आता आपण करुयात.

वरकरणी पाहता जनाबाई ह्या पंढरी च्या पांडुरंगाला चोर म्हणत आहेत व त्याच्याशी लुटूपुटीचे भांडण करीत आहेत, असा भाव आपल्या नजरेस पडतो. पण इथे पांडुरंग काकुळ तिला आला असे वाक्य आलेले आहे तर लुटूपुटीच्या भांडणात कोणी काकूळतिला येईपर्यंत भांडण करील काय ?हा प्रश्न उपस्थित होतो. म्हणून चोर कोण? विठ्ठल कोण? तो का काकुळतिला आला? आणि जनाबाई तो सुटू नये म्हणून निश्चय का करतात? याचा संदर्भ लावण्याचा पण प्रयत्न करूया.

आपण श्वास घेतो व ऊश्वास सोडतो आपल्या नाकावाटे बाहेर पडणारा ऊश्वास हा सर्वसाधारणपणे बारा बोटांपर्यंत आपल्याला जाणवतो. हा 12 बोटे बाहेर पडणारा श्वास हा यापेक्षा कमी बाहेर पडावा असे ज्ञानेश्वर महाराज सांगतात. ते म्हणतात

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### हवा-पाणी आणि वातावरण आणि डेटा सेंटर

निसर्गातील या पृथ्वीवर जैविक-अजैविक घटकाचे संतुलन थेट आपल्या स्वास्थ्यासी निगडित आहेत हे माणसाने लक्षात ठेवावे. आजच्या वेगवान औद्योगिक शहरीकरणात पर्यावरण संरक्षण एक मोठा मुद्दा आहे. स्वच्छ हवा शुध्द पाणी, सुपीक माती व शांत वातावरण हेआरोग्याचे स्तंभ आहेत. त्यासाठी टेस्टिंग अर्थात चाचण्या व ऊपयोगी डेटा सेंटर महत्वाची भुमीका बजावतात,म्हणून सर्व शहरातून पर्यावरणसंदर्भात सगळे अभ्यास हे डेटावर भर देतात. आकाश जमीन व सागरातही ऊपगृहाच्या माध्यमातून गोला केला जातो. त्याआधारे उपाययोजना, धोरणे, दुरूस्ती केल्या जातात. हवेची गुणवत्ता, पाणीपरीक्षण, मातीपरीक्षण, आणि ध्वनीप्रदूषण याच्या तपासणीची सोय होते. मग ऊद्योग, वाहतूक, आरोग्य, दररोजचे जीवन यावर ऊपाय करून सुलभता आणली जाते. प्रयोगशाळेत मिळणार्या योग्य डेटाद्वारे संशोधक, शासकीय यंत्रणा, ऊद्योग कार्यालयात, संस्था, दुकानात, माल यांना योग्य निर्णयासाठी खूप ऊपयोगी व महत्वपूर्ण ठरत आहेत. त्यासाठी आधीच योजना ऊपाय राबवून संतुलन या संस्था करतात, त्यासाठी कायदे तरतूद करतात. आज एवढे पुरे गुड डे व्हेरी गूड़ मार्निग आणि ईथे थांबतो आपण वाचत राहा सुख दु:खाचे तरंग माणसा-माणसाचे.



## पावसाळ्यात होणाऱ्या चिखल्या

**ज्योतिर्मय साहित्य**

पावसाळ्यात दूषित पाण्यामुळे पोटदुखी, जुलाब, टायफॉइड किंवा काविळीसारखे आजार होण्याचा धोका खूप जास्त असतो.

त्यामुळे या दिवसांत पाणी शुद्ध करून पिणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

पावसाळ्यात पाणी शुद्ध करण्याच्या आणि ते सुरक्षितपणे पिण्याच्या काही सोप्या व प्रभावी पद्धती खालीलप्रमाणे आहेत:

१. पाणी शुद्ध करण्याच्या सोप्या पद्धती

- पाणी उकळणे (सर्वात उत्तम उपाय):- पाणी कमीत कमी *१० ते १५ मिनिटे* कडकडवून उकळावे. उकळल्यामुळे पाण्यातील सर्व प्रकारचे हानिकारक जिवाणू आणि विषाणू नष्ट होतात. पाणी उकळल्यानंतर ते थंड होऊ द्या आणि नंतरच गाळून वापरा.

- तुरटी फिरवणे: जर पाणी खूप गढूळ असेल, तर पाण्यात स्वच्छ धुतलेली फिटकी २-३ वेळा गोल फिरवावी. यामुळे पाण्यातील माती आणि गाळ खाली तळाशी बसतो. वरचे स्वच्छ पाणी नंतर दुसऱ्या भांड्यात काढून उकळून घ्यावे.

- क्लोरीनच्या गोळ्या किंवा लिक्विड ():* पूर किंवा जास्त पावसाच्या काळात विहिरीचे किंवा नळाचे पाणी जंतूमुक्त करण्यासाठी क्लोरीनच्या गोळ्या किंवा थेंबांचा वापर करता येतो. साधारण १ लिटर पाण्यासाठी डॉक्टरांनी किंवा औषध दुकानात सांगितलेल्या प्रमाणातच याचा वापर करावा आणि पाणी अर्ध्या तासानंतर प्यावे.

पावसाळ्यात पाणी कसे व कुठे साठवावे?

- स्वच्छ भांडी : पाणी साठवण्यासाठी तांबे, पितळ, स्टेनलेस स्टील किंवा काचेच्या स्वच्छ भांड्यांचा वापर करा.

- भांडी झाकून ठेवा : पाणी साठवलेले भांडे नेहमी स्वच्छ झाकणाने व्यवस्थित झाकून ठेवा, जेणेकरून त्यात धूळ किंवा कीटक पडणार नाहीत

- हात न बुडवता पाणी काढा : भांड्यातून पाणी काढताना थेट हात किंवा पेला आत बुडवू नका. पाणी काढण्यासाठी लांब दांड्याच्या पळीचा (ओगराळे) वापर करा.

३. पाणी पिण्याचे काही महत्त्वाचे नियम

- कोमट पाणी प्या : पावसाळ्यात हवामानात गारवा असतो आणि पचनशक्ती थोडी मंदावते. त्यामुळे शक्यतो दिवसभर हलके कोमट पाणी पिणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरते.

- बाहेरचे पाणी टाळा : प्रवासात किंवा बाहेर जाताना घरूनच उकळलेले पाणी सोबत घेऊन जा. बाहेरचे उघड्यावरील पाणी, बर्फ घातलेले ज्यूस किंवा दूषित पाणी पिणे पूर्णपणे टाळा.

- तहान नसली तरी पाणी प्या : पावसाळ्यात घाम कमी येत असल्याने तहान लागत नाही, पण शरीराला पाण्याची गरज असतेच. त्यामुळे ठराविक अंतराने पाणी पीत राहा. पावसाळ्यात फक्त ''उकळून थंड केलेले पाणी'' पिण्याची सवय ठेवली, तर तुम्ही आणि तुमचे कुटुंब पावसाळी आजारांपासून दूर राहू शकता.

***

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### पुस्तक

पुस्तके असती खरे
गुरु आपणा सर्वांचे
ज्ञानामृत सर्वांना देती
अमृताचे प्राशन करुन
जीवन छान जगावे
गुरुमंत्राचा अनमोल मोती

भंडार आहे ज्ञानाचा
नित नव्या छान
पुस्तके आहेत गुरु
मनोरंजन आणि आध्यात्म
उलगडून सांगताना सुगंधी
अमृताचे प्राशन करु

# माणूसकीचे असावे अवधान




**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

मनुष्य आणि प्राणी यांच्या मध्ये फरक आहे कारण मनुष्य आत्म्याला स्पर्ष करू शकतो. आपल्या बुद्धीच्या जीवावर विचारातून त्या आत्म गुह्या पर्यंत लिलया पोहचू शकतो. आत्म्या पर्यंत पोहचण्याचा मार्ग म्हणजे मानवता जपणे किंवा माणूसकी जपणे होय असे पं. विजय शंकर मेहता आपल्या प्रवचनातून सांगत असतात . माणुसकीचा खरा अर्थ असा ।आहे की ज्यात इतरांच्या वेदना, समस्या , गरजा, समजून घेणे आणि त्यांच्यासाठी जे काय चांगले त्यांच्या साठी होईल ह्यासाठी मदत करून सर्वोत्तम देणे किंवा ते देण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करणे त्यांचे साठी सुख साधन होणे . अहं पणा, स्वार्थ, बाजुला ठेवून सेवाभाव मनात अधोरेखित करून मानव धर्माचे पालन करणे होय.

सानेगुरुजी ही आपल्याला नेहमी बजावत असतात की खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे . जगात जे गरजु लोक आहेत. जे दीन पतीत आहेत त्यांचे प्रश्न आपुलकीने विचार करून आपल्या क्षमते प्रमाणे सोडवावेत. ज्यामुळे त्यांच्या अंतर्मनाला आत्म्याला समाधान मिळेल ते क्षणभर का होईना दुःख विसरतील आनंदासाठी आपली मदत सुखद फुंकर ठरेल. अशा प्रकारे आपण सामान्य लोकाच्या आत्म्याशी जोडले जाऊन मानवता पाळण्याचे आत्म समाधान आपल्याला ही प्राप्त होईल.

माणुसकी धर्म आचरणात आणण्यासाठी समृद्ध सु विचाराच्या गरजे बरोबर त्यांची गरज पूर्ण करण्याची प्रबळ इच्छा शक्तीची गरज असते . संकल्प पुर्ती चा ध्यास मनातून असावा लागतो . जात धर्म पंथ लिंग पहाण्याची गरज नसते . आपल्याला माहित आहे की एकनाथ महाराज त्यांच्या काळी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या , तप्त वाळूत अनवा नी लहान मुलाच्या वेदना पाहून त्याला चटकन उचलून घेवून गळ्याला लावले होते किंवा तहानलेल्या गर्दभा स कावडी मधील पाणी पिण्यास दिले होते आणि त्याची तृष्णा भागविली होती ह्याच कृत्याला माणूसकी किंवा मानवतावादी मन म्हणावे लागेल कारण त्यांच्या आत्म्याचे ते एक प्रकारे मिलन होते. नाथ महाराज त्या शीशुच्या आत्म्या पर्यंत पोहचून त्याच्या व्यथे बरोबर एक रूप झाले होते. जे जे

✍ आर. पी. दुसे
छ. संभाजी नगर 9422202747



दिसे भूत ते ते मानीजे भगवंत म्हणजे माणुसकी जागविणे होय. मातृ ममता ही एक माणुसकीचेच उदाहरण आहे . कारण प्रत्येक आई आपले दुःख, व्यथा , कठीण परिस्थिती, बाजूला ठेवून आपल्या बाळाच्या सुखासाठी, रक्षणासाठी सदैव प्रयत्नशील असते . मानवतेचे कर्तव्य मनोभावे पार पाडीत असते . पण एखाद्याची चूक पाठीशी घालून त्याला संरक्षण देणे हे मात्र माणुसकीला काळीमा फास न्या सारखे असते शिवाय ढोंगी व्यक्ती ना साथ देणे हे देखिल माणुसकीच्या तत्वात बसत नाही.

अनेक व्यक्ती अज्ञान , अहंकार आणि माया मोह हया सापळ्यात कळत न कळत अडकतात कारण त्यांचा मानसिक कल नकारात्मक ते कडे झुकलेला असतो म्हणून ते सद्वर्तन, सेवा सहकार, ह्यापासून दूर राहतात, त्यांच्यात माणुसकी शिल्लक रहात नाही हे सत्य आपण नित्याच्या व्यवहारात आपण अनुभवत असतो. अर्थात त्याचं परिणाम त्यांना ह्याच देही भोगावेच लागतात . म्हणून माणुसकी धरून वागणे केव्हा ही हितावह असते त्यासाठी जागृत ज्ञानाची गरज आहे. अहंकाराच्या मी पणाचा त्याग केला पाहिजे वर्तनात सकारात्मकता ठेवली पाहिजे तर माणूसकी आपोआप अंगी भीनल्या शिवाय राहणार नाही आणि आयुष्य वेगळ्याच आनंदी मार्गावर जाते . पण त्यासाठी परिस्थितीच्या पलिकडे पाहण्याचे धाडस मात्र अंगी असले पाहिजे जसे संत एकनाथ महाराजा नी दाखविले होते.

माणूसकी जागवावयाची असल्यास मनातून प्रयत्न करून त्वरीत निर्णय घेणे गरजेचे असून आपले सेवेबद्दल सहकार्य देणे बद्दल मदती बद्दल शाश्वत मनोधैर्य असणे देखील अपेक्षित आहे दृढ आत्म विश्वासा ची त्याला साथ असावी त्यात लवचिकता किंवा धर सोड नसावी . लोक काय म्हणतील ह्या विचारा पेक्षा माझे मन काय म्हणते ह्याला प्राधान्य देवून स्वतःला आनंद मिळतो आहे म्हणून मदतकार्य

पूर्णत्वास न्यावे अर्थात हे जर आपल्या आत्म्याचे आदेश असतील तर आपण माणुसकीला धरून काम करतो आहोत हे समजण्यास काही हरकत नाही . प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करण्याची मानसिक जीद्द असल्यास पूर्ण क्षमता पणाला लावता आली तर माणसाला माणूस म्हणून जगण्याला आपला पाठींबा सिद्ध होईल म्हणून सरकारनेही पाठ्य पुस्तकातून संदेश दिला आहे की ''माणसाने माणसाशी माणसा सारखे अन् माणूस कीने वागले पाहिजे'' अर्थात माणुसकी चा अवलंब करून जे काही श्रेय कमावले जाते त्याची बरोबरी कशा नेच होत नसते .

(क्रमशः)



# शासकीय विभागीय ग्रंथालयात लेखन प्रेरणा दिना सह ग्रंथप्रदर्शनास सुरुवात

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या लेखनातून समाजातील उपेक्षितांच्या आणि शोषितांच्या व्यथा, वेदना अत्यंत तीव्रतेने मांडल्या. अण्णा भाऊ साठे यांचे लेखन हे मराठी साहित्यातील नवं लेणं आहे, असे गौरवोद्गार ज्येष्ठ साहित्यिक डॉ. कोंडबा हाटकर यांनी काढले. अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या लेखन प्रेरणा दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. शासकीय विभागीय ग्रंथालयात अण्णा भाऊ साठे यांच्या दुर्मिळ साहित्याचे ग्रंथप्रदर्शन सध्या सुरू आहे. पुढील आठवडाभर या प्रदर्शनाला वाचनप्रेमींना भेट देता येणार आहे.

शासकीय विभागीय ग्रंथालय, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय तसेच मॉडर्न संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष ग्रंथप्रदर्शन व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, तर उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. नामदेव सानप आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव उपस्थित होते.

आपल्या व्याख्यानात डॉ. हाटकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अण्णाभाऊ साठे यांच्यातील वैचारिक ऋणानुबंध उलगडून दाखवले.

दुर्मिळ साहित्याचे प्रदर्शन

सुनील हुसे म्हणाले, अण्णाभाऊंचे साहित्य सकस, समृद्ध आणि आशयघन आहे. आजच्या तरुण पिढीने त्यांच्या या प्रगल्भ साहित्याचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव, तर सूत्रसंचालन अनिल बाविस्कर यांनी केले. आभार तांत्रिक सहाय्यक गोविंद खेडकर यांनी मानले. ग्रंथालयाचे वाचक, सभासद, कर्मचारी, मॉडर्न कॉलेजचे शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अण्णाभाऊ साठे यांच्या दुर्मिळ साहित्याचे प्रदर्शन आठवडाभर कार्यालयीन वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे. वाचकप्रेमी नागरिकांनी या प्रदर्शनास भेट द्यावी आणि ग्रंथालयाचे सभासद व्हावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी केले.

# 'मी दिवा विझवला नाही' गझलसंग्रहाचे ८ ऑगस्ट रोजी प्रकाशन

## प्रकाशनानंतर 'गझलसंगम'मध्ये निवडक गझलांचे सादरीकरण

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**


छत्रपती संभाजीनगर – मराठी गझलविश्वातील संवेदनशील अभिव्यक्तीला नवा चेहरा देणाऱ्या गझलकार गिरीश जोशी यांच्या 'मी दिवा विझवला नाही' या गझलसंग्रहाचा प्रकाशन सोहळा शनिवार, ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.३० वाजता गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी सभागृह, सरस्वती भुवन महाविद्यालय, निराला बाजार येथे होणार आहे. शब्द,भाव आणि संगीताचा सुरेल संगम घडविणाऱ्या या कार्यक्रमात प्रकाशनासोबतच बहारदार गझलांच्या मैफलीचा आस्वादही रसिकांना घेता येणार आहे.

मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संगीतकार,गझल गायक गझलनवाज भीमराव पांचाळे असतील. ज्येष्ठ गझलकार व समीक्षक प्रमोद खराडे हे गझलसंग्रहावर भाष्य करणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ कवी श्रीधर नांदेडकर उपस्थित राहणार आहेत.

'गझलसंगम ' मैफलीमध्ये शब्द–सुरांचा संगम

प्रकाशनानंतर ' गझलसंगम ' या विशेष मैफलीत गिरीश जोशी यांच्या निवडक गझलांचे सादरीकरण होणार आहे. गझलेच्या तरल शब्दांना सुरांची साथ लाभणार असून प्रा. गिरीश काळे (बासरी), सारंग अर्धापूरकर (सतार) आणि वैभव बनसोडे (कीबोर्ड) हे साथसंगत करणार आहेत. त्यामुळे हा कार्यक्रम केवळ पुस्तक प्रकाशनापुरता मर्यादित न राहता गझलसंगमाचा अविस्मरणीय अनुभव देणारा ठरणार आहे.





साहित्यप्रेमींसाठी पर्वणी

गझलसंग्रहाचे प्रकाशन, गझलांवरील भाष्य आणि त्यानंतर थेट गझल सादरीकरण अशा त्रिवेणीमुळे हा कार्यक्रम साहित्यप्रेमी आणि गझलरसिकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. शब्द, स्वर आणि संवेदनांचा मिलाफ अनुभवण्याची संधी या निमित्ताने रसिकांना मिळणार आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन ध्यास गझल साहित्य समूह , न्यू ईरा पब्लिशिंग हाऊस यांनी केले आहे. कार्यक्रमाचे निमंत्रक कस्तुरी गिरीश जोशी असून, शहरातील साहित्यिक, सांस्कृतिक आणि कलाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

मराठी गझलेचा समृद्ध वारसा आणि नव्या पिढीची अभिव्यक्ती यांना जोडणारा हा सोहळा छत्रपती संभाजीनगरच्या सांस्कृतिक विश्वातील महत्त्वाचा साहित्यिक कार्यक्रम ठरण्याची अपेक्षा आहे.

संपर्कासाठी – ९२२६७५०६२१





सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



## स्वत:वर विश्वास ठेवणं इतकं कठीण का झालं?

कधीकधी आयुष्यात असा क्षण येतो, जेव्हा आपण आरशात स्वतःकडे पाहतो आणि मनात एकच प्रश्न उमटतो—"मी खरंच काही करू शकतो का?" हा प्रश्न साधा वाटतो; पण याच प्रश्नापासून अनेक स्वप्नं जन्म घेण्याआधीच मरतात.

"मी पुरेसा चांगला नाही..."

"माझ्यापेक्षा सगळे पुढे गेले..."

"मी कितीही प्रयत्न केले तरी माझ्याने काही होणार नाही..."

हे शब्द कुणी दुसरं बोलत नाही. हे शब्द तो स्वतःच स्वतःला सांगत असतो.

आणि आयुष्यातील सर्वात मोठा पराभव इथेच सुरू होतो.

कारण जगाने तुमच्यावर विश्वास ठेवला नाही, तरी तुम्ही जिंकू शकता. पण तुमच्या स्वतःच्या मनानेच तुमची साथ सोडली, तर कोणतीही लढाई जिंकता येत नाही.

लहानपणी आठवतं?

पहिल्यांदा सायकल शिकताना किती वेळा पडलो होतो. गुडघे फुटले, डोळ्यांत पाणी आलं.

पण आईने धूळ झटकली, बाबा म्हणाले, "पुन्हा प्रयत्न कर." आणि आपण पुन्हा उभे राहिलो.

आजही पडतो आपण...

फरक एवढाच की आता गुडघे फुटत नाहीत; आत्मविश्वास तुटतो.

आता जखमा शरीरावर नाहीत, त्या मनावर होतात.

एका अपयशाने... एका नकाराने...

एका चुकीने... एका टोमण्याने...

आपण स्वतःलाच दोषी ठरवतो.

मोठं होत गेलो, तसं परिस्थिती बदलली. गुणांवरून तुलना झाली, नोकरीवरून तुलना झाली.दुसऱ्यांच्या आयुष्यातले आनंदाचे क्षण पाहून आपण आपल्या संघर्षाची तुलना त्यांच्या यशाशी करू लागलो. आणि नकळत आपल्या मनातील आत्मविश्वासाची ज्योत मंदावू लागली.

खरं तर जगाचा अविश्वास आपल्याला फारसा हरवत नाही; आपण स्वतःवर केलेला अविश्वास आपल्याला हरवतो.

# कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495



## आतुरता श्रावणाची

सोइ मम इष्टदेव रघुवीरा।
सेवत जाहि सदा मुनिधीरा॥

अर्थ : श्रीरघुवीर हेच माझे आराध्य दैवत आहेत. महान ऋषी-मुनी ज्यांची अखंड सेवा करतात, तेच माझे इष्टदेव आहेत.

तसेच पुढे ते स्पष्ट म्हणतात—

होइ अकाम जो छल तजि सेइहि।
भगति मोरि तेहि संकर देइहि॥

अर्थ : जो मनुष्य कपट, दांभिकता व स्वार्थाचा त्याग करून निष्काम भावाने भगवान शिवांची उपासना करतो, त्याला भगवान शंकर श्रीरामांच्या चरणांची भक्ती प्रदान करतात.

हीच भगवान शिवांची सर्वोच्च कृपा होय. कारण त्यांना ठाऊक आहे की, जगातील सर्व वैभव, पद, प्रतिष्ठा, ऐश्वर्य आणि सिद्धी क्षणभंगुर आहेत; परंतु श्रीरामांच्या चरणी असलेली भक्ती जीवाला जन्म-मरणाच्या बंधनातून मुक्त करते.

म्हणून भगवान शिवांच्या कृपेचे सर्वोत्तम फळ म्हणजे श्रीरामभक्ती होय.

परंतु जेव्हा भगवान आशुतोष एखाद्या भक्तावर अत्यंत प्रसन्न होतात, तेव्हा ते त्याला आणखी एक अतिदुर्मिळ, परम गोपनीय आणि दिव्य रत्न बहाल करतात —परब्रह्म भगवान श्रीकृष्णांच्या चरणांची प्रेमभक्ती.

श्रीमद्भागवत महापुराणात भगवान शिव स्वतः म्हणतात—

आराधनानां सर्वेषां विष्णोराराधनं परम्।
तस्मात् परतरं देवि तदीयानां समर्चनम्॥

अर्थ : हे देवि! सर्व प्रकारच्या उपासनांमध्ये भगवान विष्णूंची आराधना सर्वोत्तम आहे; आणि त्याहीपेक्षा श्रेष्ठ म्हणजे त्यांच्या भक्तांची सेवा.

भगवान श्रीकृष्ण भगवद्गीतेत म्हणतात—

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः।
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम्॥ (गीता १८.५५)

( क्रमश:)



# महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

## 'मामा' (माहेरचा समृद्ध दुवा)

पुढे.....

याचे सर्वात मोठे आणि ऐतिहासिक उदाहरण म्हणजे भारताचे महान सुपुत्र, पहिले थोर इंजिनियर भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या! सर विश्वेश्वरय्या लहान असतानाच त्यांच्या वडिलांचे छत्र हरवले. अशा अत्यंत बिकट आणि कठीण प्रसंगात त्यांच्या आईला आणि बाल-विश्वेश्वरय्यांच्या शिक्षणाला त्यांच्या मामाने विश्वासाचा आणि भक्कम आधार दिला. मामाने लावलेल्या या विश्वासाच्या रोपट्यातूनच पुढे देशाचा एक महान शिल्पकार घडला!

मामा-मामी आणि भाच्यांचे हे प्रेम केवळ भावनांपुरते मर्यादित न राहता व्यवहारातही अगदी मूर्त स्वरूपात दिसते. आपल्याकडे अनेक हॉटेल्स, दुकाने किंवा व्यवसायांची नावे 'मामा-भाचे' अशी असलेली आपण आवर्जून पाहतो. ही केवळ व्यावसायिक नावे नसतात, तर एकमेकांवरील अथांग विश्वास, साथ आणि प्रेमाचे ते जिवंत प्रतीक असतात.

आपल्या संस्कृतीच्या इतिहासात पौराणिक कथांमध्ये या नात्याच्या चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही छटा दिसतात. (क्रमश:)

# शिवसह्याद्रीची कन्या

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

इंग्रजी भाषेतून त्यांनी २१ वेपनस् टू रोअर लाईक लायन : टेक्निकल नॉन फिक्सीशन सेल्फ हेल्प बुक,द रिबेलिअस आऊटरेज: नॉन फिक्सीशन सेल्फ हेल्प बुक,९० डेज मिरॅकल : द प्रॅक्टिकल अ‍ॅन्ड इफेक्टीव्ह मॅनिफेस्टेशन जर्नल युजिंग एन एल पी,व ब्रोकन विझ्पर्स-शॉर्ट स्टोअरी बुक यासारखे लेखन तर आगामी लेखन कार्य देखील चालू ठेवले आहे.

नाव प्रगती असले तरी केवळ स्वतःसाठी न जगता,सामाजिक कार्याची आवड व सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी शेतकरी वर्गाच्या समस्या सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिल्या आहेत. शेताच्या बांधावर स्वतः उपस्थित राहून त्या शेतकरी बंधूना मार्गदर्शना सोबतच नांगर हातात घेऊन शेतीविषयक माहिती देतात.विविध प्रशिक्षणांचे आयोजन करून त्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्यातही त्यांचा मोलाचा वाटा आहे.गोरगरीब जनतेच्या मदतीसाठी सदैव तत्पर आहेत.

प्रत्येकाची आवडी-निवडी वेगळ्या असतात.परंतु यांना इतिहास संशोधनाचे एवढे वेड आहे की,त्यांना ते कधी स्वस्थ बसू देत नव्हते.त्यामुळेच त्यांनी आपल्या



जिद्द,चिकाटी,जिज्ञासा,चौकस वृत्ती आणि मेहनत यांच्या जोरावर त्यांनी अनेक गडांची भ्रमंती केली आहे तसेच इतिहास संशोधक मंडळात सहभागी होऊन त्याचेमार्फत विरगळ व सतीशिळा यांचा ही अभ्यास त्या करीत आहेत.सोबतच भाला चालवणे, दांडपट्टा फिरवणे,तलवारबाजी व घोडस्वारी हे कौशल्यदेखील त्यांनी आत्मसात केले आहे. अन् हेच गुण त्यांनी आपल्या मुलाच्या आचरणात आणणेसाठी दैनंदिन कृती,गिर्यारोहण,विविध प्रशिक्षणाची माध्यमे,छत्रपती शिवाजी महाराज यांचेशी संबंधित पुस्तके व ग्रंथ यांचे वाचन करणेस त्याला प्रोत्साहन देत.त्याचा फायदा असा झाला की,त्यांचा मुलगा ही त्यांच्या बरोबरीने बालवयातच मराठी व इंग्रजी भाषेतून लेखन करुन आपली पुस्तके प्रकाशित करत आहे त्याची निष्ठा ही आपल्या आईसारखे होण्याची आहे.असे संस्कार व विचार प्रत्येक मुलाला कुटुंबातून मिळाले तर देश नक्कीच प्रगती पथावर राहील.

ही ओळख जरी साधारणशी अशी वाटत असली तरी शिकण्यासारखे भरपूर आहे.कारण चूल-मूल या संकल्पनेला म्हणजेच चौकटीस भेदून एका स्त्रीने अनेक आव्हानांना पादाक्रांत केले आहे. तिच्यातील ही क्षमता समाजास विचार करणेस भाग पाडणारी आहे. तिची विविधांगी रुपे शस्त्रास्त्र हाती न घेता समाज परिवर्तन करणेस उपयुक्त आहेत हेच सांगण्याचा उद्देश आहे.




# हॉलस्टॅट : तलावाकाठचे सुंदर स्वप्न (भाग दहावा)

**ज्योतिर्मय साहित्य**



साल्झबर्गच्या आग्नेयेला पसरलेला एक प्रदेश आहे, साल्झकामरगुट. डोंगर, दऱ्या आणि असंख्य नितळ तलावांनी नटलेला हा भाग म्हणजे निसर्गाने अगदी निवांतपणे, प्रेमाने रंगवलेले चित्र. याच प्रदेशातल्या एका गावाचे नाव आम्ही कित्येक वर्षांपासून ऐकत होतो, त्याचे फोटो पाहून हरखून जात होतो ते म्हणजे हॉलस्टॅट. आज अखेर तिथे प्रत्यक्ष जायचे होते.

साल्झबर्गहून बसने आम्ही हॉलस्टॅटच्या दिशेने निघालो. वाटेत लागणारे हिरवेगार डोंगर, त्यांच्या पायथ्याशी विसावलेली शांत गावे, आणि मधूनच डोकावणारे आरशासारखे तलाव. प्रत्येक वळणावर गाडी थांबवावी आणि नुसते बघत बसावे असे वाटत होते. आणि मग हॉलस्टॅटचे पहिले दर्शन झाले, आणि आम्ही अक्षरशः स्तब्ध झालो.

डोंगराच्या उतरत्या कुशीत, तलावाच्या अगदी काठाशी वसलेले ते चिमुकले गाव उतरत्या छपरांची रंगीत लाकडी घरे, मधोमध उंच चर्चचा निमुळता मनोरा, आणि हे सगळे संथ, नितळ पाण्यात जसेच्या तसे उलटे प्रतिबिंबित झालेले. मागे उभे बर्फाच्छादित डोंगर, वर निळे आकाश, आणि पाण्यावर तरंगणारे हंस. हे दृश्य इतके अवास्तव, इतके सुंदर होते, की खरे मानायला मन तयार होत नव्हते. जगातल्या सर्वात सुंदर गावांपैकी एक म्हणून हॉलस्टॅटची ख्याती आहे, आणि ते युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीतही समाविष्ट आहे. इथे उभे राहिल्यावर ते का, हे वेगळे सांगावे लागत नाही.

गावात शिरलो. अरुंद, दगडी गल्ल्या, खिडक्यांमध्ये फुलांच्या कुंड्या, आणि पावलोपावली नजरेला सुखावणारे कोपरे. मधोमध एक छोटासा चौक मार्क्टप्लात्स आणि तिथे निवांत बसलेले पर्यटक. इथला प्रत्येक कोपरा जणू फोटो काढण्यासाठीच बनवलेला. आम्ही घाई न करता, निवांतपणे हे गाव अनुभवत फिरलो.

आणि खरं सांगायचं तर, इथे प्रत्येक क्षण म्हणजे फक्त आणि फक्त सौंदर्याचाच अनुभव होता. नजर जिथे वळेल तिथे काहीतरी सुंदर, कधी पाण्यात उमटलेले घरांचे प्रतिबिंब, कधी फुलांनी सजलेली एखादी खिडकी, कधी धुक्यात हरवलेले डोंगरमाथे, तर कधी तलावावर तरंगणारा एखादा हंस. प्रत्येक सेकंदाला डोळ्यांना नवे सौंदर्य दिसत होते, आणि मन ते साठवता साठवता थकून जात होते. जणू निसर्गाने इथे आपले सगळे रंग, सगळी कलाकुसर मुक्तहस्ते उधळून टाकली होती. असे वाटत होते की इथून कधी हलूच नये, नुसते बसून राहावे आणि हे अखंड सौंदर्य डोळ्यांत, मनात भरून घ्यावे.




हॉलस्टॅटला जगातल्या सर्वात सुंदर गावांपैकी एक मानले जाते, किंबहुना काही जागतिक क्रमवारींमध्ये त्याचा समावेश जगातल्या सर्वात देखण्या गावांच्या पहिल्या काही नावांत होतो. आणि याच सौंदर्यामुळे या चिमुकल्या गावाला एक वेगळीच गंमतीशीर समस्याही आहे. इथली कायमस्वरूपी लोकसंख्या जेमतेम आठशेच्या आसपास. म्हणजे आपल्या एखाद्या छोट्या गल्लीएवढीच! पण ऐन पर्यटन हंगामात इथे रोज दहा हजारांपर्यंत पर्यटक येतात, आणि वर्षभरात ही संख्या तब्बल दहा लाखांच्या घरात जाते. म्हणजे गावातल्या स्थानिक माणसांपेक्षा कितीतरी पट अधिक पर्यटक! इतक्या लहानशा गावावर एवढ्या गर्दीचा ताण पडतो, तरीही हॉलस्टॅटने आपले जुने, शांत सौंदर्य आजही अगदी नीट जपून ठेवले आहे आणि हेच त्याचे खरे वैशिष्ट्य!

या तलावाचे सौंदर्य फक्त काठावरून पाहून समाधान होणे शक्यच नव्हते म्हणून आम्ही तिथे बोटिंगचाही आनंद घेतला. नितळ, हिरवट-निळ्या पाण्यावर हलकेच डुलणारी बोट, सभोवताली उंच डोंगरांची भव्य भिंत आणि पाण्यात जसेच्या तसे उमटलेले गावाचे प्रतिबिंब. बोटीतून पुढे सरकताना हॉलस्टॅट वेगवेगळ्या कोनांतून दिसत होते, आणि प्रत्येक कोन आधीच्यापेक्षा सुंदर वाटत होता. थंडगार वारा, पाण्याची मंद हालचाल, आणि सगळीकडे पसरलेली ती गहिरी शांतता. तो खरोखरच खूप सुखद, मनाला निवांत करणारा अनुभव होता. या बोटिंगमुळे हॉलस्टॅटच्या आठवणीत एक आणखी खास पान जोडले गेले.

दुपारी आम्ही जेवायला थांबलो, ते थेट तलावाच्या काठावरच असलेल्या एका छानशा रेस्टॉरंटमध्ये. आणि हे जेवण म्हणजे नुसते पोट भरणे नव्हते, तर एक अनुभव होता. समोर पसरलेला तो नितळ, शांत तलाव, त्याभोवतीचे उंच डोंगर आणि पाण्यावर तरंगणारे हंस, हे सगळे न्याहाळत, निवांतपणे जेवणाचा आस्वाद घेणे ही एक वेगळीच मजा होती. थंडगार वाऱ्याची झुळूक, पाण्याचा मंद आवाज, आणि नजरेसमोर असे अलौकिक निसर्गसौंदर्य.. अहाहा! अशा वातावरणात केलेले ते जेवण खरोखरच खूप मस्त, मनात कायम राहणारा अनुभव ठरले.

हॉलस्टॅट फक्त सुंदरच नाही, तर अतिशय प्राचीनही आहे. या गावाच्या वरच्या डोंगरात हजारो वर्षांपासून मीठ काढले जाते. इथली मिठाची खाण जगातल्या सर्वात जुन्या खाणींपैकी एक मानली जाते. हॉलस्टॅट या नावातला हाल म्हणजेच जुन्या भाषेत मीठ. या मिठानेच शतकानुशतके या गावाला समृद्धी दिली. डोंगरावर जाणाऱ्या फ्युनिक्युलरने वर गेल्यावर स्कायवॉक नावाच्या एका पुढे आलेल्या सज्ज्यावरून संपूर्ण गाव आणि तलाव एका नजरेत सामावून घेता येतो. तो नजारा आयुष्यभर लक्षात राहणारा.

गावात एक आगळीवेगळी जागाही आहे. चर्चजवळचे छोटेसे अस्थिगृह. जागा कमी असल्याने इथे जुन्या काळी दफन केलेल्यांच्या कवट्या नंतर काढून, त्यांवर नाजूक नक्षी आणि नावे रंगवून त्या जपून ठेवल्या जात. थोडे गूढ, थोडे हुरहुर लावणारे, पण या गावाच्या दीर्घ इतिहासाची साक्ष देणारे.

दिवसभर भटकून संध्याकाळी आम्ही तलावाच्या काठावर एका बाकावर येऊन बसलो. सूर्य डोंगरामागे झुकत होता, पाण्याचा रंग सोनेरीतून जांभळट होत चालला होता, आणि सगळीकडे एक गहिरी, समाधानी शांतता पसरली होती. लाटांचा मंद आवाज, दूरवर चर्चची घंटा, आणि थंडगार वारा. या क्षणी वाटले काही जागा फक्त पाहायच्या नसतात, त्या अनुभवायच्या असतात, मनात कायमच्या साठवून ठेवायच्या असतात. हॉलस्टॅट ही त्यातलीच एक.

म्युनिकपासून सुरू झालेला हा प्रवास...भव्य चौक, राजवाडे, संगीताची शहरे, आणि आता हा तलावाकाठचा स्वर्ग, प्रत्येक टप्प्यावर काहीतरी नवे, काहीतरी अविस्मरणीय देऊन जात होता. मनाच्या कोपऱ्यात हॉलस्टॅटच्या या आठवणी जपत, संध्याकाळी उशिरा आम्ही परत साल्झबर्गला परतलो. पण ऑस्ट्रियाचा सगळ्यात मोठा खजिना अजून बाकी होता. दुसऱ्या दिवशी आम्ही निघणार होतो त्या राजधानीच्या शहराकडे, जिथे सम्राटांचे वैभव आणि संगीताचा वारसा एकत्र नांदतो ''व्हिएन्ना''.

(क्रमशः)

# आकड्यांचे मायाजाल : जगणं मोजायचं की अनुभवायचं?

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

मी आज माझ्या आई-वडिलांशी दहा मिनिटं निवांत बोललो का?

मी आज सूर्यास्त पाहिला का?

या प्रश्नांची उत्तरं कोणत्याही अ‍ॅपमध्ये मिळत नाहीत.

कारण जीवनातील सर्वात मौल्यवान गोष्टींचं मोजमाप नसतं; फक्त अनुभव असतो.

फ्रेंच लेखक अँटोइन द सेंट-एक्झुपरी यांनी द लिटल प्रिन्स मध्ये लिहिलं आहे

''जे खरंच महत्त्वाचं असतं, ते डोळ्यांना दिसत नाही.''

कदाचित त्यात आणखी एक वाक्य जोडता आलं असतं

''आणि ते आकड्यांतही मोजता येत नाही.''



शून्याकडे परत जाणारा प्रवास

तारुण्य ओसरतं. केस पांढरे होतात. नोकरी संपते. वाटतं, आता तरी या आकड्यांच्या शर्यतीतून सुटका होईल. पण तिथेही आकडे आपली पाठ सोडत नाहीत.

आता चर्चा बदलते.

''पेन्शन किती?'' ''साखर किती?''

''१ किती?'' ''बीपी किती?''

''मुलगा अमेरिकेत किती वर्षांपासून आहे?''

''नातवाचं पॅकेज किती?''

वय वाढतं; पण आकड्यांचं ओझं कमी होत नाही. उलट, आयुष्याचा अनुभव मोजण्याऐवजी आपण अजूनही आकड्यांची बेरीज-वजाबाकी करत बसतो.

आणि मग... एक दिवस पडदा पडतो.

माणूस जातो.

पण आश्चर्य म्हणजे, मृत्यूनंतरही त्याचा पाठलाग आकडेच करतात.

अंत्ययात्रेला किती लोक आले?

श्रद्धांजलीच्या पोस्टला किती प्रतिक्रिया आल्या?

वर्तमानपत्रात किती ओळी छापल्या गेल्या?

संपत्ती किती मागे ठेवली?

किती वारसदार?

ज्याचं संपूर्ण आयुष्य आकड्यांत गेलं, त्याचा शेवटही आकड्यांतच मोजला जातो.

आणि या सगळ्यातून सुटलोच, तर आपल्या समाजाने एक वाक्य कायमचं आपल्या मनात रोवून ठेवलं आहे

''चार लोक काय म्हणतील?''

किती विलक्षण आहे ना!

जन्मापासून मृत्यूपर्यंत तो चार हा आकडा आपली पाठ सोडत नाही.

आता जरा निसर्गाकडे पाहूया.

समुद्राला स्वतःच्या लाटांची संख्या माहीत नसते.

झाडाला किती पानं गळाली याचं दुःख नसतं.

आकाश कधी तारकांची गणना करत नाही.

नदी प्रत्येक थेंबाचा हिशेब ठेवत नाही.




फुल उमलताना किती लोक त्याचं कौतुक करतील, याची वाट पाहत नाही.

सूर्य रोज उगवतो; पण कालपेक्षा आज जास्त प्रकाश दिला की कमी, याचं गुणपत्रक तयार करत नाही.

निसर्गाचं संपूर्ण अस्तित्व एका साध्या तत्त्वावर उभं आहे

तो स्वतःची तुलना कोणाशीच करत नाही.

म्हणूनच तो सुंदर आहे.

म्हणूनच तो मुक्त आहे.

आणि कदाचित म्हणूनच तो आनंदी आहे.

आपण मात्र वेगळे आहोत.

आपण घर विकत घेतो; पण त्याची किंमत सांगताना त्यातल्या आठवणी सांगत नाही.

आपण प्रवास करतो; पण निसर्गापेक्षा फोटोवर आलेल्या लाईक्स मोजतो.

आपण मित्र जोडतो; पण मैत्रीपेक्षा कॉन्टॅक्ट्स मोजतो.

आपण पुस्तकं विकत घेतो; पण विचारांपेक्षा किंमत लक्षात ठेवतो.

हळूहळू आपल्या आयुष्यातील प्रत्येक अनुभव एका आकड्यात रूपांतरित होतो.

आणि त्याच क्षणी त्या अनुभवाची जादू हरवते.

संत कबीर म्हणतात

''जब मैं था तब हरि नहीं, अब हरि हैं मैं नाहीं.''

या दोन ओळींमध्ये संपूर्ण जीवनाचं सार दडलं आहे.

मी कमी झाला की जीवन मोठं होतं.

माझं कमी झालं की समाधान वाढतं.

आणि आकड्यांचा अहंकार विरघळला की माणूस पुन्हा स्वतःला भेटतो.

भारतीय गणिताने जगाला शून्य दिलं.

इतिहास सांगतो की शून्य ही केवळ गणितातील खूण नव्हती; ती मानवी विचारशक्तीतील सर्वात मोठ्या क्रांतींपैकी एक होती. त्या एका चिन्हामुळे अनंत शक्यता उघडल्या.

पण मला नेहमी वाटतं

शून्याचा शोध हा केवळ गणिताचा नव्हे, तर जीवनाचाही धडा आहे.

शून्य स्वतः काहीच नसतं; पण योग्य ठिकाणी उभं राहिलं, तर एका आकड्याला दहापट, शंभरपट, हजारपट मोठं करून टाकतं.

आणि चुकीच्या ठिकाणी उभं राहिलं, तर त्याची किंमत शून्यच राहते.

माणसाचं आयुष्यही तसंच आहे.

**(क्रमशः)**

# युरोप दर्शन

वामन वा. कोठेकर

मोबाईल : +91 98606 99972



## बारा देश तेवीस शहरे !

पुढे.....

ठरल्याप्रमाणे आम्ही ८मे रोजी सकाळी ६ वाजता एअरपोर्ट वर पोचलो टूर मॅनेजर अक्षयची तिथे भेट झाली. आमच्या बॅग्स चेक इन करून आम्ही बोर्डिंग पास घेऊन सिक्युरिटी चेक आणि इमिग्रेशन पूर्ण करून बोर्डिंग गेट ला आलो. टूर मधील बाकी लोक देखील हळूहळू येत होते आमची अद्याप ओळख झाली नव्हती. आम्ही थोड्याच वेळात फ्लाईट बोर्ड केली आणि आमच्या टूर ला सुरुवात झाली. ही लंडन मधील गॅटविक एअरपोर्टला जाणारी फ्लाईट होती. आमचेसाठी इंडियन व्हेजिटेरियन जेवण फ्लाईट मध्ये ऑर्डर केलेलं होत.

१. यू के (ग्रेट ब्रिटन)

यु के अर्थात इंग्लंड बघण्याची उत्सुकता होतीच कारण भारतावर दीडशे वर्ष राज्य करणाऱ्या साम्राज्यवाद्यांचा हा देश कसा आहे हे पाहायचे होते. आपल्या देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात प्राणांची आहुती देणाऱ्या वीरांना फासावर लटकावणाऱ्या आणि अनेक क्रांतिकारकांना तुरुंगात डांबणाऱ्या इंग्रजांचा हा देश आहे तो तर बघितलाच पाहिजे असे विचार मनात येत होते. अखेर आमचे विमान युरोपात लंडनला लँड झाले आणि युरोप टूर ला सुरवात झाली.

♦ लंडन

आम्ही रात्री १० वाजता लंडन येथे गॅटविक एअरपोर्ट वर पोचलो. अक्षयने आम्हा सर्वांना हॉटेल पर्यंत जाण्यासाठी लक्झरीबस अरेंज करून ठेवली होती त्यामध्ये बसून आम्ही हॉटेलला पोचलो. तिथे डिनर करून रूम चेक इन केले आणि दिवसभर प्रवास झाल्याने आराम केला.

दुसरे दिवशी लोकल लंडन पहायचे होते सकाळी आम्ही लंडन ब्रीज ला गेलो अनेक चित्रपटांमध्ये बघितलेला प्रसिद्ध लंडन ब्रीज प्रत्यक्ष पाहिला.तिथे काही फोटो काढून आम्ही टॉवर ऑफ लंडन म्युझियम बघायला गेलो. अनेक ऐतिहासिक वस्तू,राजमुकुट, तिथे होती जगप्रसिद्ध असा भारतातील कोहिनूर हिरा पाहण्याची संधी तिथे मिळाली . तेथून मग आम्ही बँकिंगहॅम पॅलेस बघायला गेलो. ब्रिटिश राजघराण्याचे हे निवासस्थान. तेथील राजघराण्याचा ध्वज त्याची साक्ष देत होता.सुरक्षा व्यवस्था चोख होतीच पण राष्ट्रीय स्मारक म्हणून टुरिस्ट ची गर्दी होती. ब्रिटिश पार्लमेंट बाहेरूनच बघून वाटेत लंच करून आम्ही मादाम तूसा म्युझियम येथे आलो.आमच्यासाठी अमेरिकेनंतर दुसऱ्यांदा असे म्युझियम आम्ही बघत होतो अर्थात हे लंडन चे म्युझियम होते. राणी व्हिक्टोरिया, प्रिन्स चार्ल्स आणि डायना, विन्स्टन चर्चिल, अनेक शास्त्रज्ञ अशा अनेक मोठ्या लोकांचे स्टाच्यू तिथे होते.तेथून आम्ही लंडन आय ची राईड करण्यासाठी गेलो. लंडन आय हा थेम्स नदीच्या काठावर उभारलेला प्रचंड मोठा टॅब्लेट आकाराचे पाळणे असलेला इलेक्ट्रिक रहाट पाळणा आहे याच्या एका टॅब्लेट मध्ये तीस ते चाळीस लोक बसू शकतात. हा टॅब्लेट वर गेल्यावर काचेतून आपण संपूर्ण लंडन शहर बघू शकतो एवढी उंची त्याची आहे म्हणूनच त्याला लंडन आय म्हणत असावेत. तेथून आम्ही परत हॉटेलकडे आलो. डिनर आटोपून रूममध्ये जाऊन दुसऱ्या दिवशीची तयारी करून झोपलो. दुसरे दिवशी सकाळी सात वाजता आम्हाला पॅरिस साठी निघायचे होते.

क्रमशः

# कृती संशोधन प्रबंध "परिसर अभ्यास - वृक्ष संवर्धन"

कु शिवन्या अशोक पवार जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेमळा मोराळे केंद्र चितळी तालुका खटाव जिल्हा सातारा

## "वृक्ष संवर्धनासाठी विद्यार्थ्यांनी राबविलेल्या कृतींचा पर्यावरण जागृतीवर झालेला परिणाम"

🌴प्रस्तावना : वृक्ष हे पर्यावरणाचे महत्त्वाचे घटक आहेत. ते प्राणवायू देतात, प्रदूषण कमी करतात, पावसाचे प्रमाण टिकवून ठेवण्यास मदत करतात आणि जैवविविधतेचे संरक्षण करतात. विद्यार्थ्यांमध्ये वृक्षांचे महत्त्व रुजावे व प्रत्यक्ष कृतीतून वृक्ष संवर्धनाची सवय लागावी, या उद्देशाने हा कृती संशोधन प्रकल्प राबविण्यात आला.

🌴समस्या : विद्यार्थ्यांना वृक्षांचे महत्त्व माहिती असूनही झाडे लावणे व त्यांची नियमित काळजी घेणे या सवयी कमी प्रमाणात दिसून येतात.

🌴उद्दिष्टे : विद्यार्थ्यांमध्ये वृक्षप्रेमाची भावना निर्माण करणे.
वृक्ष लागवड व संवर्धनाचे महत्त्व समजावून सांगणे.
प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक रोप लावून त्याची जबाबदारी स्वीकारणे.
पर्यावरण संरक्षणाविषयी सकारात्मक दृष्टीकोन विकसित करणे.

🌴गृहितक : विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष वृक्ष लागवड करून त्यांची नियमित काळजी घेतल्यास पर्यावरणाविषयी जागरूकता व जबाबदारीची भावना वाढेल.

🌴कृती संशोधन : इयत्ता ३ री व ४ थीचे ३० विद्यार्थी

🌴कालावधी : ४ आठवडे

🌴विद्यार्थ्यांनी राबविलेल्या कृती : शाळेच्या परिसरात वृक्षांचे निरीक्षण करून त्यांची यादी तयार केली.
प्रत्येक विद्यार्थ्याने एक रोप लावले.
दररोज रोपांना पाणी घातले व वाढीची नोंद वहीत केली.
"माझे झाड - माझी जबाबदारी" हा उपक्रम राबविला.
वृक्ष संवर्धनावरील घोषवाक्ये, चित्रकला व पोस्टर तयार केले.
गावातील नागरिकांना वृक्षसंवर्धनाबाबत जनजागृती केली.
प्लास्टिकचा वापर कमी करण्याचा संकल्प केला.

निरीक्षणे
विद्यार्थ्यांचा वृक्षांविषयीचा उत्साह वाढला.
रोपांची नियमित काळजी घेण्याची सवय लागली.
परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत जागरूकता वाढली.
पालकांनीही वृक्ष लागवडीत सहभाग घेतला.
विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी निर्माण झाली.

🌴निष्कर्ष : प्रत्यक्ष कृतीद्वारे विद्यार्थ्यांमध्ये वृक्ष संवर्धनाची आवड निर्माण झाली. वृक्षांचे महत्त्व समजले आणि पर्यावरण संरक्षणासाठी स्वतः पुढाकार घेण्याची प्रेरणा मिळाली. "एक विद्यार्थी - एक वृक्ष" हा उपक्रम यशस्वी ठरला.

🌴 विद्यार्थ्यांची प्रतिज्ञा : "मी दरवर्षी किमान एक वृक्ष लावीन, त्याचे संगोपन करीन आणि इतरांनाही वृक्ष संवर्धनासाठी प्रेरित करीन."

🌴घोषवाक्ये
झाडे लावा, झाडे जगवा. एक विद्यार्थी – एक वृक्ष.
हरित परिसर, सुंदर भविष्य. वृक्ष आहे जीवनाचा श्वास.

# ऋतू हिरवा, ऋतू बरवा

डॉ. मीना श्रीवास्तव मो. 99201 67211





नमस्कार मैत्रांनो,

जीवघेण्या ग्रीष्म वृत्तीची काहिली पृथ्वीचे अंग प्रत्यंग जाळतेय. जागोजागी भेगा पडून विच्छिन्न झालेली ही वसुंधरा जणू भग्न मूर्तीसारखी भकास बघतेय एकटक आसमंताकडे! या कोमलांगी प्रेयसीला समीराचे उष्ण श्वास अंतर्बाह्य पोळत आहेत, त्यावर 'चंदनाची चोळी' देखील शीतलता प्रदान करायला असमर्थ आहे! नजरेत प्राण एकवटून तिच्या अंतरीची आस वाट बघतेय, कुठं दिसतोय का 'शामलवर्णीय मेघदूत' अन त्याची चंचल खट्याळ सखी विद्युल्लता! कारण या दूताने ग्वाही दिल्याशिवाय तिचा प्रियतम अवतरतच नाही. अन एक दिवस या जीवघेण्या प्रतीक्षेचा अंत होतो श्यामवर्णी मेघांच्या सेनेची अति जलद गरुडभरारी आसमंतात दृष्टिपथास येते! एका बाजूने आक्रमण करीत करीत संपूर्ण नीलाकाशाला व्यापून टाकीत युद्ध जिंकल्याच्या आनंदात त्यांचे गडगडाटी हास्य पृथ्वीला तिच्या प्रियकराची चाहूलच वाटते. मेघाच्या संगती त्याची प्रेयसी विद्युलता आपले चपलांगी हास्य करीत मेघांना रुपेरी रंगाने सजवते. हा जामानिमा तयार झाला की येतो पाऊस. आपल्या प्रेयसी वसुंधरेला कोवळ्या नाजूक सरींच्या स्पर्शाने हलकेच गोंजारून मग मात्र आवेगाने तिचे अंग अंग आपल्या सहस्त्रबाहू जलधारांनी कवेत घेत बरसतो! या प्रणयाचे साक्षीदार असतात वृक्षलता, आनंदाने आपला पिसारा फुलवून नर्तन करणारे मयूर आणि पावसाच्या एका थेंबानेच तृप्त होणारा चातक!

मंडळी, पाऊस म्हटला की सामान्यजनांना सय येते ती वाफाळलेल्या अदरक घातलेल्या कडक मीठी चाय अथवा जायफळ घातलेल्या धुंद वाफेने गंधाळलेल्या कॉफीची, सोबतीला गरमागरम कांद्याची किंवा तत्सम भजी असली तर ब्रम्हानंदी टाळी लागलीच म्हणून समजा आमची! पण या 'कवी' नामक फुलपाखरी गिरकी घेत पावसाचा अनुभव घेणाऱ्या व्यक्तींची जातकुळीच वेगळी हो! (क्रमश:)

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559